**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra, India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240) 2403118/119/115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/संलग्न/एआरडब्ल्यु/२०२२-२३/ 4412-18 — दि. २८-०७-२०२२.

**प्रति,**
**प्राचार्य,**
श्री पुरोगामी शिक्षण सांस्कृतिक क्रीडा प्रसारक मंडळ संचलित,
कै. वामनराव पितांबरे महाविद्यालय,
पडेगाव, औरंगाबाद.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येवू नये, त्याबाबत .**

**संदर्भ :-** १) चौकशी समिती नियुक्त करणे संदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (क) अन्वये करण्यात आलेली तरतूद.
२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (च) अन्वये द्रव्यदंड व प्रवेश बंद करणेबाबत करण्यात आलेली तरतूद.
३) मा.कुलगुरु महोदयांनी पारित केलेले आदेश (प्रपत्र-१) दि. २८ जूलै, २०२२.

**महोदय/ महोदया,**

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा.कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास कळविण्यात येते की, **श्री पुरोगामी शिक्षण सांस्कृतिक क्रीडा प्रसारक मंडळ संचलित, कै. वामनराव पितांबरे महाविद्यालय, पडेगाव, औरंगाबाद.**या महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या एकूण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमापैकी संदर्भ क्र. (३) अन्वये मा.कुलगुरु महोदयांनी पारित केलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १२ (१४) (च) अन्वये विहित केल्यानुसार द्रव्यदंड आकारुन महाविद्यालयातील सर्व संबधित अभ्यासक्रमास विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येवू नये, या बाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

प्रस्तूत प्रकरणी संदर्भ क्र. (३) प्रपत्र-१ अन्वये मा.कुलगुरु महोदयांच्या स्वाक्षरीने पारित केलेल्या आदेशाचे महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने व महाविद्यालयाने अनुपालन करणे आवश्यक असून तद्अनुषंगाने आकरण्यात आलेले द्रव्यदंड विहित मुदतीत विद्यापीठाच्या लेखा विभागास भरणा करणे अनिवार्य आहे.

**सोबत :** मा.कुलगुरु महोदयांचे आदेश.

उपकुलसचिव
(शैक्षणिक विभाग)

**प्रतिलिपी :**

१. **मा. सहसंचालक,** उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर.

२. **मा. संचालक, परिक्षा व मुल्यामापन मंडळ,** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

३. **संचालक, युनिक विभाग,** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना या पत्राची एक प्रत देवून विनंती करण्यात येते की, उक्त प्रकरणी मा. कुलगुरु महोदयांनी पारित केलेले आदेश पालक व विद्यार्थ्याच्या निदर्शनास यावे म्हणून विद्यापीठाच्या संकेत स्थळावर तात्काळ प्रसिध्द करण्यात यावे.

४. **अध्यक्ष / सचिव,** श्री पुरोगामी शिक्षण सांस्कृतिक क्रीडा प्रसारक मंडळ संचलित, कै. वामनराव पितांबरे महाविद्यालय, पडेगाव, औरंगाबाद यांना माहितीस्तव अग्रेषित.

५. **व्यवस्थापक,** एम. के. सी. एल., परिक्षा विभाग, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

६. **कक्ष अधिकारी,** पात्रता विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ औरंगाबाद यांना माहितीस्तव सादर.

**उपकुलसचिव**
(शैक्षणिक विभाग)

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,

औरंगाबाद-४३१००४ महाराष्ट्र (भारत)

नॅक 'अ' श्रेणी प्राप्त

प्रा.(डॉ.) प्रमोद येवले

एम. फार्म., पीएच.डी., डी.बी.एम.

कुलगुरु

दूरध्वनी : ०२४०-२४०३३९९, २४०३४००

कार्यालय : ०२४०-२४०३११२

E-mail : vc@bamu.ac.in

Website : www.bamu.ac.in


## आदेश

(प्रपत्र-१)

संदर्भ :-

१) मा. कुलगुरु महोदयांना प्राप्त असलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (क) अन्वये चौकशी समिती नियुक्त करणेबाबत करण्यात आलेली तरतूद.

२) चौकशी समिती का करण्यात येवू नये? याबाबत विद्यापीठाने निर्गमित केलेली नोटीस / पत्र दि. ०५-०७-२०२२.

३) चौकशी समिती नियुक्त करणेबाबत आपल्या महाविद्यालयाने / व्यवस्थापनाने सादर केलेला खुलासा दि ०७-०७-२०२२.

४) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (ख) अन्वये मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशानुसार अधिष्ठाता डॉ. चेतना सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेली समिती दिनांक ०८-०७-२०२२.

५) चौकशी समितीने महाविद्यालयास दिलेली भेट दिनांक १२-०७-२०२२ व दिनांक १७-०७-२०२२.

६) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (ग) अन्वये चौकशीच्या वेळेस व्यवस्थापनाचे अध्यक्ष / सचिव किंवा प्रतिनिधी उपस्थित राहणेबाबत विद्यापीठाने दिलेले आदेश दिनांक ०८-०७-२०२२.

७) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (घ) अन्वये चौकशी समितीच्या निष्कर्षानुसार महाविद्यालयाने खुलासा सादर करावे, याबाबत विद्यापीठाचे पत्र दिनांक २० जूलै, २०२२.

८) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (घ) अन्वये विहित केल्यानुसार चौकशी समितीच्या निष्कर्षाप्रमाणे महाविद्यालय / व्यवस्थापनाने सादर केलेला खुलासा दिनांक २५ जूलै, २०२२.

९) सुनावणीस उपस्थित राहणेबाबत मा. कुलगुरु महोदयांनी दिनांक २५ जूलै, २०२२ रोजी दिलेल्या आदेशानुसार सुनावणीस दिनांक २७ जूलै, २०२२ रोजी उपस्थित राहणेबाबत विद्यापीठाचे पत्र दिनांक २५ जूलै, २०२२.

१०) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० (४) अन्वये विहित केल्यानुसार पात्र दिनांकास नॅक मुल्यांकन / पुनर्रमुल्यांकन न झालेल्या महाविद्यालयांचे विहित केलेल्या प्रक्रियेने संलग्नीकरण रद्द करणेबाबत विद्यापरिषदेने घेतलेला निर्णय दिनांक ३० नोव्हेंबर, २०२१.

११) विस्तारीकरणा अंतर्गत शासनाने मंजूर केलेल्या अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांनी एका वर्षाच्या आत अर्ज करुन नॅक मुल्यांकन / पुनर्रमुल्यांकन करणे अनिवार्य असणेबाबत शासन निर्णय दिनांक १५ जून, २०२१.

१२) नवीन महाविद्यालयांना अंतिम मान्यता देणे संदर्भात निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार सर्व संबंधित महाविद्यालयांनी विहित कालमर्यादेत / पात्र दिनांकास नॅक मुल्यांकन करणेबाबत शासन निर्णय दिनांक ३१ ऑगस्ट, २०२१.

१३) नियमित प्राचार्य व अध्यापकांची नियुक्ती करणे व नॅक मुल्यांकन करणेबाबत विद्यापीठाचे परिपत्रक दि २८ मार्च, २०२२, दि. २७ जूलै, २०२२ व विद्यापीठाचे पत्र दिनांक ०५-०५-२०२२, दि. ०७-०६-२०२२.

**पुरोगामी शिक्षण सांस्कृतिक व क्रिडा प्रसारक मंडळ, सावळदबारा संचलित, कै. वामनराव पिंताबरे व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय, पडेगाव, जि. औरंगाबाद** या महाविद्यालयाकडे सुरु असलेल्या पदवी / पदव्युत्तर अभ्याक्रमाकरिता नियमामध्ये विहित केल्याप्रमाणे पायाभुत सुविधांची पाहणी / तपासणी करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (क) अन्वये विहित केल्यानुसार कुलगुरुंना प्राप्त असलेल्या अधिकारात विद्यापीठाचे अधिष्ठाता **डॉ. चेतना सोनकांबळे** यांच्या अध्यक्षतेखाली **०५ सदस्यिय** चौकशी समिती नियुक्त करण्यात आलेली होती. प्रस्तुत समितीने दिनांक **१२ जूलै, २०२२ व दि. १७ जूलै, २०२०** रोजी सदरील महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून महाविद्यालयाकडे उपलब्ध असलेल्या पायाभूत सुविधा व मानवसंसाधन यांची चौकशी केली. सदरील चौकशी समितीने दिनांक **२० जूलै, २०२२ रोजी** या कार्यालयास सविस्तर अहवाल व प्रत्यक्ष भेटीचे छायाचित्रण सादर केले. तद्अनुषंगाने चौकशी समितीचा निष्कर्ष महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास **दिनांक २०-०७-२०२२** रोजी

कळवून खुलासा मागविला असता महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने उक्त प्रकरणी **दिनांक २५-०७-२०२२** रोजी खुलासा सादर केला. प्रस्तुत प्रकरणी चौकशी समितीच्या शिफारशी व नियमातील तरतूदी लक्षात घेता मी **प्रा. डॉ. प्रमोद येवले, कुलगुरु, प्रस्तुत विद्यापीठ,** महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (च) अन्वये विहित केल्याप्रमाणे प्राप्त असलेल्या अधिकारानुसार खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

१) प्रस्तुत महाविद्यालयाकडे उपलब्ध पायाभुत सुविधा व मानवसंसाधनाची उणीव लक्षात घेता सदरील महाविद्यालयाकडे सुरु असलेल्या एकुण पदवी अभ्यासक्रमापैकी बी.ए. अभ्यासक्रमास ६० प्रवेश क्षमतेप्रमाणे एक तुकडी, बी.एस्सी. अभ्यासक्रमास ६० प्रवेश क्षमतेप्रमाणे एक तुकडी, बी.कॉम. अभ्यासक्रमास ६० प्रवेश क्षमतेप्रमाणे एक तुकडी व बी.सी.ए. अभ्यासक्रमास ३० प्रवेश क्षमतेप्रमाणे एका तुकडीस दोन महिण्याच्या कालावधी मध्ये कार्यभारानुसार आवश्यक अध्यापकांची विद्यापीठाच्या विहित निवड समिती मार्फत विहित केलेल्या प्रक्रियेने नियुक्ती करण्याच्या अटीवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (७) अन्वये विद्यापरिषदेच्यावतीने सदरील महाविद्यालयाकडे आवश्यक पायाभूत सुविधा नसणे, आवश्यक क्षेत्रफळासह अद्ययावत प्रयोगशाळा व साहित्य नसणे, महाविद्यालय विकास समिती व प्रोसेडिंग रजिस्टर उपलब्ध नसणे, CPF भरणा न करणे, नॅक मुल्यांकन न करणे, महाविद्यालयाच्या खरेदी प्रक्रियेत अनियमितता आढळणे, ऑडीट रिपोर्टमध्ये अनियमितता असणे, आवश्यक अध्यापक व अध्यापिकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती न करणे, अध्यापक / प्राचार्य भरती प्रक्रियेची जाहिरात मानधन तत्वावर प्रसिध्द करणे, आवश्यक ग्रंथसंपदा नसणे, वेतण श्रेणीवर अध्यापक कर्मचाऱ्यांची नियुक्ती न करणे इत्यादी व तत्सम कारणामुळे प्रवेश क्षमता कमी करुन सदरील अभ्यासक्रमास संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे. उक्त प्रकरणी अध्यापक नियुक्त करणेबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहित मुदतीत विद्यापीठास सादर करण्यात यावे, त्या शिवाय प्रवेशित विद्यार्थ्यांचे परिक्षा आवेदन पत्र स्विकारले जाणार नाही, असे आदेशित करण्यात येत आहे.

प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय दिनांक १५ जुन २०२१ अन्वये विहित केल्यानुसार विस्तारिकरणाअंतर्गत अभ्यासक्रम मंजूर करतांना नमुद अटी नुसार नॅक मुल्यांकन करणे आवश्यक असून तद्अनुषंगाने नॅक मुल्यांकनासाठी दोन महिन्याच्या आत अर्ज करुन तसा अहवाल विद्यापीठास सादर करणे आवश्यक आहे तसेच आपणास उक्त प्रकरणी असेही अवगत करण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिव विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११० (४) अन्वये करण्यात आलेली तरतूद व विद्यापरिषदेने दिनांक ३० नोंव्हेबर २०२१ रोजी घेतलेल्या निर्णयानुसार पात्र दिनांकास नॅक मुल्यांकन/ पुनर्रमुल्यांकन न केल्यास महाविद्यालयांना संलग्निकरण देण्यात येणार नाही, याची गांर्भियाने नोंद घेणे आवश्यक आहे.

२) प्रस्तुत महाविद्यालयामध्ये सुरु असलेल्या बी.बी.ए. अभ्यासक्रमाची विनाअनुदानित तत्वावरील एक तुकडी तसेच एम.कॉम., एम.ए. इतिहास, एम.ए. हिंदी व एम.पी.एम. या पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी सदरील महाविद्यालयामध्ये पायाभुत सुविधा उपलब्ध नसणे, आवश्यक क्षेत्रफळासह अद्ययावत प्रयोगशाळा व साहित्य नसणे, महाविद्यालय विकास समिती व प्रोसेडिंग रजिस्टर उपलब्ध नसणे, CPF भरणा न करणे, नॅक मुल्यांकन न करणे, महाविद्यालयाच्या खरेदी प्रक्रियेत अनियमितता आढळणे, ऑडीट रिपोर्टमध्ये अनियमितता असणे, आवश्यक अध्यापक व अध्यापिकेत्तर कर्मचाऱ्यांची नियुक्ती न करणे, अध्यापक / प्राचार्य भरती प्रक्रियेची जाहिरात मानधन तत्वावर प्रसिध्द करणे, आवश्यक ग्रंथसंपदा नसणे, वेतण श्रेणीवर अध्यापक कर्मचाऱ्यांची नियुक्ती न करणे, कार्यभारानुसार तसेच विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकाप्रमाणे आवश्यक अध्यापकांची नियुक्ती न करणे इत्यादी व तत्सम कारणामुळे शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ पासून नवीन प्रवेश बंद करण्याचे निर्देश महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास तसेच महाविद्यालयीन प्रशासनास देण्यात येत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ,
## औरंगाबाद-४३१००४ महाराष्ट्र (भारत)
नॅक 'अ' श्रेणी प्राप्त

**प्रा.(डॉ.) प्रमोद येवले**
एम. फार्म., पीएच.डी., डी.बी.एम.
कुलगुरु

दूरध्वनी : ०२४०-२४०३३९९, २४०३४००
कार्यालय : ०२४०-२४०३११२
E-mail : vc@bamu.ac.in
Website : www.bamu.ac.in

---

३) प्रस्तुत महाविद्यालयाकडे सुरु असलेल्या बी.ए, बी.कॉम व बी.एस्सी या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रत्येकी एका तुकडीस ६० प्रवेश क्षमते प्रमाणे तसेच बी.सी.ए. या अभ्यासक्रमास ३० प्रवेश क्षमतेप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२२-२०२३ करीता कार्यभारानुसार अनुज्ञेय अध्यापक विद्यापीठाच्या विहित निवड समिती मार्फत विहित केलेल्या प्रक्रियेने दोन महिण्याच्या आत नियुक्त करण्याच्या अटीवर संलग्निकरण प्रदान करण्यात येत आहे. उक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विहित मुदतीत विद्यापीठास सादर करण्यात यावे, त्या शिवाय प्रवेशित विद्यार्थ्यांचे परिक्षा आवेदन पत्र स्विकारले जाणार नाही, असे आदेशित करण्यात येत आहे.

४) प्रस्तुत महाविद्यालयाची स्थापना शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून झालेली आहे परंतू महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने नियमित अर्हताधार प्राचार्य व अध्यापकांची विद्यापीठाच्या विहित निवड समिती मार्फत विहित केलेल्या प्रक्रियेने कार्यभारानुसार अनुज्ञेय अध्यापकांची नियुक्ती केलेली नाही. तसेच सदरील महाविद्यालयामध्ये अद्ययावत प्रयोगशाळा नाही, प्रयोगशाळेचे क्षेत्रफळ नियमानुसार नाही, विद्यार्थी प्रमाणात संगणकसंच उपलब्ध नाही, प्रयोगशाळेस लागणारे आवश्यक उपकरणे व साहित्य उपलब्ध नाही, अद्ययावत ग्रंथालय नाही, ग्रंथलायामध्ये ग्रंथ संपदा अंत्यत तुटपुंजी आहे तसेच महाविद्यालयाने सादर केलेला लेखा परिक्षण अहवालानुसार (Audit Report) वेतन व इतर सोई सुविधेसाठी अंत्यत कमी व अत्यल्प खर्च केल्याचे आढळून आलेले असल्यामुळे उक्त प्रकरणी सदरील महाविद्यालय कार्यवाहीस पात्र आहे.

५) प्रस्तुत आदेशातील अनुक्रमांक (२) अन्वये विनर्दिष्टित करण्यात आलेल्या बंद अभ्यासक्रमांबाबत महाविद्यालयाने सहा महिन्याच्या आत विद्यापीठास अनुपालन अहवाल सादर करावे तद्नंतर महाविद्यालयाची विद्यापीठाकडून तज्ञ समितीद्वारा तपासणी करुन सदरील अभ्यासक्रम पुढे सुरु ठेवावे किंवा कसे, याबाबत विद्यापीठाच्या विद्यापरिषदेद्वारे निर्णय घेण्यात येईल.

६) प्रस्तुत महाविद्यालयातील ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश बंद करण्यात आलेले आहे, त्या अभ्यासक्रमाच्या लागू असलेल्या द्वितीय / तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रम व शैक्षणिक कार्य महाविद्यालयाने आवश्यक त्या अध्यापकांची नेमणूक करुन पूर्ण करणे अनिवार्य आहे तसेच ज्या पदव्युत्तर अभ्यासक्रमांना लघूशोध प्रबंधाची आवश्यक आहे, असे लघूशोध प्रबंध विद्यापीठ मान्यता प्राप्त पदव्युत्तर अध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करुन तसा अहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावा व संबंधित विद्याशाखेच्या अधिष्ठातांनी अहवाल तपासून तद्अनुषंगाने सदरील विद्यार्थ्यांना परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात यावी.

७) प्रस्तुत महाविद्यालयास सोई सुविधा, प्राध्यापक व इतर बाबी नियमामध्ये विहित केल्यानुसार नसतांना सुध्दा सदरील महाविद्यालयास वार्षिक संलग्नीकरण एवढया सर्व अभ्यासक्रमांना कोणत्या नियमानुसार संलग्नीकरण मान्यता देण्यात आलेली आहे, या संदर्भात तत्कालीन काळातील सर्व चौकशी समित्यांची चौकशी करुन त्यास जबाबदार असलेले समिती सदस्य व विद्यापीठ अधिकारी यांच्यावर नियमानुसार कार्यवाही प्रस्तावित करण्यात यावी.

८) प्रस्तुत महाविद्यालयाच्या व्यवस्थापन व प्रशासनाने खोटी व बनावट माहितीबाबतचे दस्ताऐवज समितीस अथवा विद्यापीठास सादर केल्याचे आढळून आल्यास नियमानुसार सर्व संबंधितावर पोलिसामध्ये तक्रार करण्यात यावी.

९) प्रस्तुत महाविद्यालयाच्या प्रशासन व व्यवस्थापनाने महाविद्यालयामध्ये सोई सवलती उपलब्ध करुन न देणे, कार्यभारानुसार आवश्यक अध्यापकांची नेमणूक न करणे, शासन आदेशाचे उल्लंघन करणे, विद्यापीठ परिपत्रक व परिनियमांचे उल्लंघन केल्याचे आढळून आल्यामुळे महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १२ (१४) (च) अन्वये असलेल्या तरतूदीनुसार सदरील महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास रक्कम रुपये २,००,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष) दंड करण्यात येत आहे. सदरील दडांची रक्कम महाविद्यालयाने सदर आदेशाच्या दिनांका पासून पुढील पंधरा दिवसाच्या आत विद्यापीठाच्या लेखा विभागास भरणा करावा. सदरील महाविद्यालयाने निर्धारित कालावधीत दंडाची रक्कम न भरल्यास दंडाच्या रक्कमेवर ७% व्याज आकारण्यात यावे.

१०) प्रस्तुत महाविद्यालयाच्या संदर्भात विद्यापीठाने पारित केलेले आदेश विद्यार्थी व पालकांच्या माहितीसाठी परिपत्रकाद्वारे प्रसिध्द करण्यात यावे, तसेच सदरील आदेश विद्यापीठाच्या संकेतस्थळावर माहितीसाठी प्रसिध्द करण्यात यावे. तद्अनुषंगाने सदरील अभ्यासक्रमांना विद्यार्थ्यांनी प्रवेश घेवू नये, विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यास याबाबत विद्यापीठ जबाबदार राहणार नाही, असेही सदरील परिपत्रकात नमुद करुन प्रसिध्दी देण्यात यावी.

**प्रा. डॉ. प्रमोद येवले**
**कुलगुरु**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**
**मराठवाडा विद्यापीठ,**
**औरंगाबाद**

**स्थळ:** विद्यापीठ प्रागंण.
**दिनांक.** २८ जुलै, २०२२